### ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक - शिक्षणतज्ज्ञ

# व्ही. टी. पाटील यांचे निधन

**कोल्हापूर, दि. १७ : शिक्षण, राजकारण, समाजकारण, सहकार, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्राशी गेले सुमारे पाऊण शतक संबंधित असलेले ताराराणी विद्यापीठ व श्री मौनी विद्यापीठाचे संस्थापक, माजी नगराध्यक्ष, माजी आमदार व माजी खासदार व्ही. टी. काका तथा विश्वनाथ तुकाराम पाटील यांचे आज पहाटे वयाच्या ९४ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिव देहावर आज दुपारी पंचगंगा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.**

गेले काही दिवस प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना इस्पितळात दाखल करण्यात आले होते. पण आज पहाटे साडेपाच वाजण्याच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली. साईक्स एक्स्टेंशन येथील निवासस्थानी व नंतर ताराराणी विद्यापीठ या त्यांच्या कर्मभूमीत त्यांचा पार्थिव देह अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आला होता. तेथे विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांच्या पार्थिव देहावर पुष्पहार घालून अभिवादन केले.

दुपारी सव्वाबारा वाजता ताराराणी विद्यापीठातून अंत्ययात्रा निघाली. फुलांनी सजविलेल्या जीपवर व्ही. टी. पाटील यांचा पार्थिव देह ठेवण्यात आला आणि ताराराणी विद्यापीठ या आपल्या कर्मभूमीचा अखेरचा निरोप घेतला तेव्हा त्यांच्या मानसकन्या कांचन परुळेकर यांना दुःखावेग आवरला नाही. अंत्ययात्रा ताराराणी विद्यापीठाच्या आवारातून हळूहळू पुढे सरकत होती तेव्हा दुतर्फा उभारलेल्या ताराराणी विद्यापीठाच्या विद्यार्थिनींनी व शिक्षक-शिक्षिकांनी पाणावलेल्या डोळ्यांनी 'काकाजी अमर रहे'च्या घोषणा देत अंत्ययात्रेवर पुष्पवृष्टी केली.

शहराच्या प्रमुख मार्गांनी फिरून अंत्ययात्रा पंचगंगा



**व्ही. टी. पाटील**

स्मशानभूमीत पोचली. मार्गावर विविध व्यक्ती व संस्थांच्या वतीने कै. व्ही. टी. पाटील यांच्या पार्थिव देहावर पुष्पहार घालण्यात आले. प्राचार्य क्रांतीकुमार पाटील यांनी व्ही. टी. पाटील यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार केले. गुरुवार दि. १९ रोजी सकाळी रक्षाविसर्जन होणार आहे.

व्ही. टी. पाटील यांच्या पार्थिव देहावर महापालिकेच्या वतीने महापौर जयश्री जाधव तर जिल्हा परिषदेच्या वतीने जि. प. अध्यक्ष प्रकाश पाटील यांनी पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. दै. पुढारीचे संपादक प्रतापसिंह जाधव यांनीही काकाजींच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेऊन अभिवादन केले.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ए. टी. वरुटे, प्र. कुलगुरू बी. के. घाटे, कुलसचिव बा. प. साबळे, आमदार श्रीपतराव बोंद्रे, माजी आमदार एन. डी. पाटील, ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक, कथा लेखक दिनकर द. पाटील, गुलाबबाई कागलकर, कॉ. के. आर. आकोळकर, बाबा नेसरीकर, इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, प्राचार्य रा. कृ. कणबरकर, आबासाहेब शिंदे, के. आर. यादव, पी. बी. कोष्टी, सी. आर. गोडसे, श्री. तोगळे, प्रा. भैरव कुंभार, ॲड. शिवाजी चव्हाण, संपतराव जाधव, श्री. कटांबळे, एस. टी. जाधव, अनंत दीक्षित, अनिलपंत कोरगावकर, सरोजीनी खंजिरे, प्रा. जे. एफ. पाटील, प्रा. ओमप्रकाश कलमे, जे. आर. दाभोळे, अरुण भोसले, अरुण नरके, चंद्रकांत बोंद्रे, ॲड. शामराव शिंदे, भिकशेठ पाटील, सुरेश गवळी, गजानन भालकर, प्रा. संभाजी जाधव, बाबासाहेब पोवार, कर्नल श्यामकांत जाधव, शंकरराव निकम, प्राचार्य बामणीकर, सहा. आयुक्त श्री. सांगरूळकर, श्री. पोतदार, प्रा. शशिकांत महाडेश्वर, जे. बी. पाटील, रंगराव मांडरे, डॉ. आनंद वास्कर, चंद्रकांत पाटगावकर, आर. एस. माने, मा. गो. माळी, ए. डी. शिंदे, मदन भोसले, खंडेराव घाटगे, काकासाहेब देसाई, बाळ देसाई, डॉ. उषा इथापे, ॲड. प्रकाश हिलगे, पी. जी. यादव, एस. व्ही. सूर्यवंशी, शिवराज जगदाळे, प्रा. अनुराधा गुरव, श्री. निंबाळकर आदी मान्यवरांसह विविध क्षेत्रातील कार्यकर्ते आणि व्ही. टी. पाटील यांचे अनेक चाहते अंत्ययात्रेस उपस्थित होते.

(पान ८ वर)

# कै. व्ही. टी. पाटील यांच्या सेवाभावी वृत्तीचा विविध वक्त्यांकडून गौरव

[पान एकवरून]

व्ही. टी. पाटील यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार झाल्यानंतर पंचगंगा स्मशानभूमी येथे त्यांना आदरांजली वाहण्यासाठी शोकसभा झाली.

समाजसेवेच्या वेडापायी संपूर्ण जीवन समर्पित करणारा कर्मयोगी अशा शब्दात व्ही. टी. पाटील यांचे वर्णन करून माजी कुलगुरू रा. कृ. कणबरकर म्हणाले, सरकार, बँकिंग, शिक्षण, समाजकारण अशा विविध क्षेत्रात आपल्या ध्येयवादी जीवनाचा ठसा उमटवला. आज महिलाविषयी धोरणांमुळे महिलांना सर्व क्षेत्रात संधी मिळत आहेत. त्या संधींचा लाभ उठवू शकणारी सक्षम स्त्रीशक्ती बनवण्यासाठी ५० वर्षांपूर्वीपासून काकाजींनी कामाला सुरुवात केली होती. स्त्री शिक्षणात त्यांनी अजोड कार्य केले. महाराणी ताराराणींच्या नावाने महिलांसाठी विद्यापीठ स्थापन करणे हीच त्यांना खरी

म्हणाले, काकाजींना इतिहासाविषयी विशेषतः करवीरच्या राज्यसंस्थापिका महाराणी ताराराणींच्या कर्तृत्वाविषयी अमाप आदर होता. हे महान व्यक्तिमत्त्व उपेक्षित राहिल्याची खंत त्यांना कायम बोचत राहायची. प्रा. भैरव कुंभार म्हणाले, व्ही. टी. पाटील यांनी ग्रामीण भागात शिक्षण प्रसार करण्याचे कार्य एखाद्या व्रताप्रमाणे चालवले. ॲड. शिवाजीराव चव्हाण म्हणाले, संपूर्ण पाऊण शतकाच्या कोल्हापुरातील सार्वजनिक जीवनावर त्यांनी ठसा उमटवला.

यावेळी उपमहापौर आनंदराव सुतार, बाबा नेसरीकर, सौ. उगारे, चंद्रकांत पाटगावकर, मा. गो. माळी यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या.

रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार एन. डी. पाटील आपल्या शोकसंदेशात म्हणाले, त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात केलेले काम मूलगामी स्वरूपाचे आहे. त्यांनी निश्चित दृष्टिकोन बाळगून स्त्री

कामकाज बंद ठेवण्यात आले. तसेच त्यांना महापालिकेत झालेल्या शोकसभेत श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. अध्यक्षस्थानी महापौर जयश्री जाधव होत्या. यावेळी आयुक्त विपिन मलिक, उपायुक्त दिलीप करंदीकर, नगरसचिव व्ही. कै. सावंत आदी उपस्थित होते.

* श्री. दूधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना बिद्री येथे शोकसभा होऊन व्ही. टी. पाटील यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली व कार्यालयीन कामकाज बंद ठेवण्यात आले.

* कोल्हापूर : मारुती जीवबा नेमाणे [वय ८०, रा. परिते] या वृद्धाने गळफास लावून घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला.

दै. पुढारी, दि. १८ जानेवारी १९९५ पान चार

पुढारी
संस्थापक संपादक
संपादक : प्रतापसिं
बी.ए. [ऑ.], एल
* मुद्रक, प्रकाशक